हॉटेल
राजलक्ष्मी
व्हेज & नॉनव्हेज
कुटुंबासाठी जेवणाची स्वतंत्र आणि उत्तम सोय
निसर्गरम्य वातावरणात जेवणाचा आनंद घेण्यासाठी प्रशस्त गार्डन बैठक व्यवस्था
वाढदिवस आणि छोट्या कार्यक्रमांसाठी खास व्यवस्था
अस्सल व्हेज आणि नॉनव्हेज डिशेसची मेजवानी.
प्रो.प्रा.अजिंक्य (भैया) शिराळे
एक वेळ अवश्य भेट द्या बार्शी रोड,बीड-431122

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955
बीड - महाराष्ट्र मंगळवार दि. २१ एप्रिल २०२६ | वर्ष ६ वे | अंक ३३ | पाने ४ | पान १ | किंमत ३ रूपये
RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://epaper.marathwadapatra.com | E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

स्वराज
वॉटर सोल्युशन
आमच्याकडे सर्व कंपनीच्या वॉटर फिल्टरची विक्री व दुरुस्ती योग्य दरात केली जाईल.
प्रो.प्रा.अजय भोसले
9673798477
8830127742
मधुमीना कॉम्प्लेक्स, राजीव गांधी चौक, बीड

शुध्द सोन्या-चांदीच्या दागिन्यांची हमी मजुरीही कमी..!
कैलास ज्वेलर्स
9420469999
सुभाष रोड, कबाडगल्ली कॉर्नर, बीड

श्री.गंगाभारती कृपा
आदित्य
फर्निचर मॉल
7038389999
छत्रपती संभाजी महाराज चौक, बार्शी रोड, बीड

## अंबाजोगाई उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या...

# दुसऱ्या टप्प्यासाठी 15 कोटी मंजूर

## आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या विकासासाठी राज्य सरकारने मोठा निधी उपलब्ध करून दिला असून कार्यालयाच्या दुसऱ्या टप्प्यातील इमारत बांधकामाच्या १४ कोटी ९९ लाख ७५ हजार ४०६ रुपयांच्या निधीस प्रशासकीय आणि वित्तीय मान्यता प्रदान केली आहे. यामुळे या कार्यालयाच्या विस्तारीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेष म्हणजे या इमारतीच्या पहिल्या टप्प्याचे बांधकाम आधीच पूर्ण झाले असून त्या ठिकाणी सध्या नियमित कार्यालयीन कामकाज सुरू झाले आहे. केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी या कामासाठी सातत्याने केलेल्या भक्कम पाठपुराव्यामुळे हा निधी मंजूर झाला आहे.

महाराष्ट्राच्या माजी आरोग्यमंत्री स्व. विमलताई मुंदडा यांनी प्रयत्नपूर्वक अंबाजोगाईत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूर करून आणले होते. यामुळे अंबाजोगाईसह सहा तालुक्यातील वाहनधारकांची मोठी सोय झाली होती. सुरुवातीपासून हे कार्यालय भाड्याचे जागेत सुरु होते. त्यानंतर स्व. विमलताईंच्या सुनबाई नमिता मुंदडा यांनी शासनदरबारी पाठपुरावा करून या कार्यालयाला भव्य आणि सुसज्ज वास्तू मिळवून दिली आहे. नुकतेच हे कार्यालय स्वतःच्या नूतन वास्तूत स्थलांतरित झाले आहे. दरम्यानच्या काळात आमदार नमिता मुंदडा यांनी भविष्याच्या दृष्टीने कार्यालयाचे विस्तारीकरण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांनाही आत यश आले आहे. या दुसऱ्या टप्प्यातील कामासाठी शासनाने १५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या नवीन मंजुरीनुसार इमारतीचा स्टिल्ट फ्लोअर आणि पहिल्या मजल्याचे बांधकाम केले जाणार असून यामध्ये फर्निचर, पाणीपुरवठा, मलनिस्सारण, विद्युतीकरण आणि सौर ऊर्जा यंत्रणा बसवण्यासारख्या कामांचा समावेश आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने इमारतीला संरक्षक ▶▶ उर्वरित पान २ वर

## LPG सिलिंडरसाठी पुन्हा नवा नियम

### गॅस हवा तर द्यावा लागणार DAC नंबर, सरकारनं का घेतला निर्णय?

**मुंबई । प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या तणावाचा परिणाम जगभर पडलाय. आखाती देशात सुरू असलेल्या युद्धामुळे भारतामध्ये एलपीजी आणि पेट्रोलियम गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे.

नागरिकांना घरगुती गॅस मिळवण्यात अडचणी येत आहेत.




गॅस एजन्सीच्या बाहेर लांबच लांब रांगा लागल्या आहेतच. त्यातच बुकिंगच्या नावाखाली फसवणूकही होत आहे. हीच फसवणूक टाळण्यसाठी सरकारने एक नवीन नियम आणला आहे. (DAC) नंबरच्या या नव्या नियमांमुळे गॅस बुकिंग आणि डिलिव्हरी दरम्यान होणाऱ्या फसवणुकीपासून तुम्हाला दिलासा मिळेल. ▶▶ उर्वरित पान २ वर

## माने कॉम्प्लेक्स परिसरात गॅस सिलिंडरला भीषण आग

### अग्निशामक दलाने तत्काळ आग आटोक्यात आणल्याने मोठा अनर्थ टळला

**बीड । प्रतिनिधी**


दिनांक २० एप्रिल सोमवार रोजी सकाळी १२:३० वाजता बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात नागारगोजे यांच्या निवासस्थानी राहणारे किरायदार भारत माने यांच्या घरातील गॅस सिलिंडरला अचानक भीषण आग लागल्याने या आगीमध्ये माने यांचे हात भाजल्याने तात्काळ त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या आगीमुळे माने कॉम्प्लेक्स परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. क्षणाक्षणाला वाढणाऱ्या आगीमुळे परिस्थिती गंभीर बनली होती आणि जीवितहानी



होण्याचा धोका निर्माण झाला होता. या घटनेची माहिती अग्निशामक दलाला या भागातील नगरसेवक आदित्य (सनी) माने यांनी तत्काळ अग्निशामक दलाशी संपर्क साधत कोणताही विलंब न करता स्वतः घटनास्थळी धाव घेतली.

धगधगत्या आगीसमोर उभे राहत, जीवाची पर्वा न करता अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले व घरात अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले, त्यामुळे मोठी दुर्घटना टळली आणि अनेकांचे प्राण वाचले. तसेच, घटनेत जखमी झालेल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश धाब्यावर!;जिल्हा दुष्काळाच्या उंबरठ्यावर तरीही तलावातून अवैध पाणी उपसा सुरूच; पाणीटंचाईचे संकट गडद



**बीड । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील भायाळा साठवण तलावातून सुरू असलेल्या अवैध पाणी उपश्यामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून, जिल्हाधिकार्यांच्या स्पष्ट आदेशानंतरही संबंधित यंत्रणा निष्क्रिय असल्याचे समोर आले आहे. जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांनी पिण्याच्या पाण्याचे नियोजन कोलमडू नये यासाठी जिल्ह्यातील लघु व मध्यम प्रकल्पांमधून होणारा नियमबाह्य पाणी उपसा तत्काळ थांबवण्याचे आदेश महसूल व पाटबंधारे विभागाला दिले होते. मात्र, या आदेशांची अंमलबजावणी होत नसल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, भायाळा तलावावर अवलंबून असलेल्या भायाळा, वाघिरा, मेंगडेवाडी,

## तिंतरवणी पोलीस चौकी हद्दीत दिवसाढवळ्या वाळू तस्करी

### नागरिकांचा संताप, डीवायएसपी खटके साहेबांनी लक्ष देण्याची मागणी

**तिंतरवणी हद्दीत वाळू माफियांचा सुळसुळाट; पोलीस यंत्रणा निष्क्रिय?**

**डीवायएसपी खटके साहेबांनी तात्काळ कारवाई करावी – नागरिकांची मागणी.**



**तिंतरवणी । प्रतिनिधी**

तिंतरवणी (ता. गेवराई) पोलीस चौकीच्या हद्दीत दिवसाढवळ्या वाळूने भरलेले ट्रॅक्टर व डंपर सर्रासपणे हायवेवरून धावत असल्याचे चित्र समोर येत आहे. प्रशासनाच्या डोळ्यासमोरच सुरू असलेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, वाळू माफियांनी अक्षरशः मोकाट सुळसुळाट केला असून कोणतीही भीती न बाळगता खुलेआम वाहतूक सुरू आहे. विशेष म्हणजे, हा सर्व प्रकार दिवसा उजेडात होत असल्याने पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

तिंतरवणी पोलीस चौकीचे प्रभारी अधिकारी ▶▶ उर्वरित पान २ वर

## शिक्षणाधिकारी डॉ कुंवर मॅडम यांचा उद्धटपणा

### शिक्षक सेनेचे निवेदन स्वीकारण्यास दिला नकार; शिक्षक सेनेत संताप उफाळला!

### मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांवरून वातावरण तापले असतानाच बीड जिल्ह्यात शिक्षण विभागातील गंभीर परिस्थिती पुन्हा एकदा समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या वतीने पुकारण्यात आलेल्या राज्यव्यापी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दि. १६ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी (प्रा.) डॉ. किरण कुंवर यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यासाठी गेलेल्या शिक्षकांना धक्कादायक अनुभवाला सामोरे जावे लागले. या बाबत अधिक माहिती अशी की, शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिवाळ, संजय ढाकणे यांच्या नेतृत्वाखालील बीड जिल्ह्यातील शिक्षक या आंदोलनात सहभागी झाले होते. त्यानुसार या शिष्टमंडळाने ▶▶ उर्वरित पान २ वर

**शिक्षकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष – प्रशासनावर प्रश्नचिन्ह**

**संच मान्यता २०२५–२६ मधील त्रुटींमुळे शिक्षकांमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली आहे. त्यातच बी.एल.ओ.सह विविध अशैक्षणिक कामांचा वाढता ताण, प्रलंबित वेतन व भत्ते, एनपीएस रकमेचे प्रश्न, वरिष्ठ वेतनश्रेणी प्रस्ताव प्रलंबित राहणे अशा अनेक गंभीर मुद्द्यांवर शिक्षकांनी आवाज उठवला आहे. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांकडूनच अशा प्रकारे दुर्लक्ष होत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

**आमच्या भावना मांडायच्या कुणाकडे? – बहिवाळ यांचा संतप्त सवाल**

**या संपूर्ण प्रकारानंतर जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिवाळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत, आम्ही आमच्या मागण्या शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी अधिकाऱ्यांकडे गेलो, पण त्यांनीच आम्हाला फटकारले. त्यामुळे आता आम्ही आमचे प्रश्न कोणाकडे मांडायचे? असा संतप्त सवाल उपस्थित केला.**

बेसिक कोचिंग क्लाससेस,बीड
इयत्ता १ ली ते १० वी सेमी
समर व्हॅकेशन बॅचेस
कालावधी २० एप्रिल ते १ जुन पर्यंत
१६ वर्षांची यशस्वी परंपरा
संचालक : वायभट एम.यु.
MO : 8575717171
प्रवेश देणे सुरु आहे
पत्ता : रेणु हॉस्पिटल शेजारी, शिवाजी धांडे नगर, बार्शी रोड, बीड

पाहिजेत
● सिस्टर– (१ जागा)
ANM, GNM
अनुभव असलेल्यास प्राधान्य
(रात्रपाळीसाठी)
● मावशी– (२ जागा)
काम येणाऱ्यास प्राधान्य
(रात्रपाळीसाठी)
● भेटण्याची वेळ ११ ते २
-: संपर्क :-
जेथलिया हॉस्पिटल
जालना रोड, बीड
मो.क्रं. ७०२०५०३८३६

# अभ्यासक्रमाविना परीक्षा: उपवर्गीकरणाच्या नावाखाली लोकशाहीची कसोटी

महाराष्ट्रातील अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा मुद्दा सध्या राज्याच्या सामाजिक आणि राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखालील एक सदस्यीय समितीने दिनांक १६ मार्च २०२६ रोजी शासनाला आपला अहवाल सादर केला. त्यानंतर दि. १० एप्रिल २०२६ रोजी शासन निर्णयाद्वारे मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली या शासन निर्णयाद्वारे अहवालावर जनतेकडून आक्षेप, मते आणि निवेदने मागविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. इच्छुकांना ई-मेलद्वारे नोंदणी करून आपले अभिप्राय सादर करण्याची मुदत सुरुवातीला १५ एप्रिल २०२६ पर्यंत देण्यात आली होती, जी नंतर आणि दि. १३ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रेस नोटद्वारे वाढवून ३० एप्रिल २०२६ करण्यात आली. या सर्व प्रक्रियेचा वरकरणी हेतू लोकशाही पद्धतीने जनमत जाणून घेणे असा दिसत असला, तरी प्रत्यक्षात या प्रक्रियेतील अनेक विसंगती आणि विरोधाभास समोर येतात. सर्वात मूलभूत आणि गंभीर प्रश्न असा आहे की, ज्या अहवालावर आक्षेप आणि मते मागविली जात आहेत, तो अहवालच जर सार्वजनिक केला गेला नसेल, तर सामान्य नागरिकांनी नक्की काय वाचून, काय समजून आणि कोणत्या आधारावर आपले मत व्यक्त करायचे? ही परिस्थिती अक्षरशः अभ्यासक्रमाशिवाय परीक्षा देण्यासारखी आहे. ज्यांना 'अ ब क ड' काय आहे हेच माहीत नाही, त्यांनी त्या परीक्षेत उत्तरे लिहायची कशी? हा प्रश्न केवळ उपरोधिक नाही, तर तो लोकशाही प्रक्रियेच्या पारदर्शकतेवरच प्रश्नचिन्ह उभा करणारा आहे. लोकशाही व्यवस्थेत कोणत्याही धोरणात्मक निर्णयासाठी जनतेचा सहभाग महत्त्वाचा असतो, परंतु तो सहभाग अर्थपूर्ण आणि माहितीपूर्ण असला पाहिजे. माहितीच उपलब्ध नसेल, तर सहभाग केवळ औपचारिकतेपुरता मर्यादित राहतो. या संदर्भात पाहिले तर, अहवाल सार्वजनिक न करता मते मागविण्याची प्रक्रिया ही केवळ 'लोकशाहीचा आव आणणारी' ठरते, प्रत्यक्षात ती लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांना बाधा आणणारी आहे.

विशेषतः, महाराष्ट्रातील अनुसूचित जातींमधील मोठा वर्ग हा अजूनही सामाजिक-आर्थिकदृष्ट्या दुर्बल, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला आणि माहितीच्या अभावामुळे वंचित आहे. अशा परिस्थितीत ई-मेलद्वारे मते मागविण्याची अट ही स्वतःमध्येच भेदभाव करणारी ठरते. ग्रामीण भागातील, डिजिटल साधनसंपत्ती नसलेल्या किंवा संगणक साक्षरता नसलेल्या व्यक्तींना या प्रक्रियेत सहभागी होणे जवळजवळ अशक्यच आहे. म्हणजेच, ज्या घटकांवर या निर्णयाचा सर्वाधिक परिणाम होणार आहे, त्यांनाच या प्रक्रियेपासून दूर ठेवले जात आहे. यातून एक मोठा विरोधाभास समोर येतो की सामाजिक न्यायाच्या नावाखाली राबविण्यात येणारी प्रक्रिया प्रत्यक्षात सामाजिक अन्याय वाढविणारी ठरत आहे. उपवर्गीकरणाचा उद्देश जर अनुसूचित जातींमधील अंतर्गत विषमता कमी करणे हा असेल, तर त्या विषमतेची अचूक ओळख आणि त्यावर आधारित उपाययोजना करणे आवश्यक आहे. परंतु अहवालाची माहितीच उपलब्ध नसताना, या विषमतेचे स्वरूप काय आहे, त्याची कारणे काय आहेत आणि प्रस्तावित उपाययोजना कोणत्या आहेत, हेच समजत नसल्याने, संपूर्ण प्रक्रिया अस्पष्ट आणि संशयास्पद वाटू लागते.

शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समिती ही तीन वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची आहे. या समितीमध्ये समाजशास्त्रज्ञ, तज्ज्ञ किंवा अनुसूचित जातींचे प्रतिनिधी नसल्याने, या प्रक्रियेतील 'प्रतिनिधित्वाचा अभाव' प्रकर्षाने जाणवतो. जे लोक या निर्णयामुळे थेट प्रभावित होणार आहेत, त्यांचा आवाज या समितीत प्रतिबिंबित होत नाही, ही बाब चिंताजनक आहे. याशिवाय, ज्या अहवालावर आक्षेप आणि मते मागविण्यासाठी पाच-सहा दिवस आणि सुनावणीसाठी सुरुवातीला केवळ दोन दिवसांचा कालावधी देण्यात आला होता, ही बाबही लोकशाही प्रक्रियेच्या दृष्टीने अपुरी आणि असमाधानकारक आहे. जरी नंतर मुदत वाढविण्यात आली असली, तरी सुरुवातीचा निर्णय हा घाईघाईत आणि अपुऱ्या तयारीत घेतल्याचे स्पष्ट होते. इतक्या महत्त्वाच्या विषयावर व्यापक चर्चा, जनजागृती आणि संवाद आवश्यक असतो, जो येथे दिसून येत नाही.

अहवाल सार्वजनिक न करण्यामागील कारणे काय असू शकतात, हा देखील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. जर अहवालात मांडलेली माहिती, आकडेवारी आणि शिफारसी या वैज्ञानिक आणि तर्कसंगत असतील, तर त्या सार्वजनिक करण्यास काय हरकत आहे? उलट, पारदर्शकतेमुळे जनतेचा विश्वास वाढतो आणि निर्णय प्रक्रियेची वैधता अधिक दृढ होते. परंतु अहवाल गुप्त ठेवून मते मागविणे ही पद्धत संशय निर्माण करणारी ठरते. या संपूर्ण प्रक्रियेकडे पाहिले असता, असे वाटते की, उपवर्गीकरणाचा प्रश्न हा केवळ सामाजिक न्यायाचा नसून, तो राजकीय आणि प्रशासकीय अजेंड्याचाही भाग असू शकतो. अनुसूचित जातींमध्ये अंतर्गत विभागणी निर्माण करणे, त्यांच्यात स्पर्धा वाढविणे आणि त्यातून राजकीय लाभ मिळविणे, हा एक संभाव्य हेतू असू शकतो, अशी शंका निर्माण होते. अशा परिस्थितीत, समाजातील एकात्मता आणि बंधुता धोक्यात येऊ शकते.

उपवर्गीकरणाच्या माध्यमातून काही जातींना अधिक लाभ देण्याचा प्रयत्न केला गेला, तर इतर जातींमध्ये असंतोष निर्माण होऊ शकतो. यामुळे सामाजिक तणाव वाढण्याची शक्यता आहे. सामाजिक न्यायाच्या नावाखाली जर नव्या प्रकारची विषमता निर्माण होत असेल, तर त्या धोरणाचा पुनर्विचार करणे आवश्यक ठरते. याशिवाय, या प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव, प्रतिनिधित्वाचा अभाव, आणि सर्वसमावेशकतेचा अभाव हे तीन मोठे दोष स्पष्टपणे दिसून येतात. हे दोष दूर केल्याशिवाय कोणताही निर्णय घेणे म्हणजे समाजावर प्रयोग करण्यासारखे आहे. आणि समाजावर केलेले असे प्रयोग दीर्घकालीन दृष्टीने हानिकारक ठरू शकतात. म्हणूनच, शासनाने या संपूर्ण प्रक्रियेचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. सर्वप्रथम, अहवाल पूर्णपणे सार्वजनिक करणे, त्यावर व्यापक चर्चा घडवून आणणे, विविध स्तरांवरील प्रतिनिधींना सहभागी करून घेणे आणि त्यानंतरच कोणताही निर्णय घेणे, हीच योग्य दिशा ठरू शकते. अन्यथा, हा निर्णय सामाजिक न्यायाच्या नावाखाली सामाजिक विषमता वाढविणारा ठरू शकतो.

या प्रश्नाकडे अधिक सखोलपणे घटनात्मक तरतुदी, सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय आणि व्यापक सामाजिक परिणाम या तिन्ही अंगांनी पाहणे आवश्यक ठरते. कारण कोणतेही आरक्षण धोरण हे केवळ प्रशासकीय निर्णय नसून ते भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत मूल्यांशी आणि न्यायव्यवस्थेच्या मार्गदर्शक तत्त्वांशी जोडलेले असते. भारतीय राज्यघटनेने समानतेचे तत्त्व अत्यंत महत्त्वाचे मानले आहे. अनुच्छेद १४ सर्व नागरिकांना कायद्यापुढे समानता देतो, तर अनुच्छेद १५(४) आणि १६(४) या विशेष तरतुदींमधून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना विशेष उपाययोजना म्हणजेच आरक्षण देण्याची मुभा राज्याला दिली आहे. या तरतुदींचा उद्देश केवळ समानतेचा औपचारिक अधिकार देणे नसून, ऐतिहासिकदृष्ट्या वंचित राहिलेल्या घटकांना प्रत्यक्षात संधींची समानता मिळवून देणे हा आहे. म्हणूनच आरक्षण ही संकल्पना 'समानतेतील असमानता' स्वीकारून 'खऱ्या समानतेकडे' नेणारी उपाययोजना मानली जाते. याच पार्श्वभूमीवर अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा ठरतो. एकीकडे, राज्यघटना राज्याला मागासलेल्या घटकांसाठी विशेष उपाययोजना करण्याची मुभा देते; परंतु दुसरीकडे, त्या उपाययोजनांमुळे त्या गटामध्येच नव्या प्रकारची विषमता निर्माण होऊ नये, ही देखील एक महत्त्वाची अट आहे. उपवर्गीकरणाच्या माध्यमातून अनुसूचित जातींमध्येच 'अधिक मागास' आणि 'कमी मागास' अशा प्रकारची विभागणी केली जाते, ज्यामुळे मूलभूत एकात्मतेला तडा जाऊ शकतो.

या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे काही महत्त्वाचे निर्णय लक्षात घेणे आवश्यक आहे. काही प्रकरणांमध्ये न्यायालयाने उपवर्गीकरणाला तत्त्वतः मान्यता दिली आहे, परंतु त्यासाठी अत्यंत कठोर अटी घातल्या आहेत. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, उपवर्गीकरण केवळ तर्कशुद्ध, वस्तुनिष्ठ आणि पुराव्यांवर आधारित असले पाहिजे. केवळ राजकीय किंवा प्रशासकीय सोयीसाठी असे विभाजन करता येणार नाही. याशिवाय, अशा उपवर्गीकरणामुळे कोणत्याही गटावर अन्याय होणार नाही, याची खात्री करणेही आवश्यक आहे. मात्र, येथेच एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो की महाराष्ट्रातील या प्रक्रियेत अशा प्रकारचा वैज्ञानिक आणि पारदर्शक आधार कितपत उपलब्ध आहे? न्यायमूर्ती बदर समितीने सादर केलेला अहवाल सार्वजनिकच करण्यात आलेला नसल्याने, त्यातील आकडेवारी, विश्लेषण आणि शिफारसी यांचे स्वतंत्रपणे मूल्यमापन करणे अशक्य झाले आहे. न्यायालयाने अपेक्षित केलेली 'वस्तुनिष्ठता' आणि 'पारदर्शकता' या दोन्ही बाबी येथे प्रश्नचिन्हाखाली येतात. घटनात्मक दृष्टिकोनातून पाहिले असता, ही प्रक्रिया 'नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वां'शीही विसंगत ठरू शकते. नैसर्गिक न्यायाचा एक मूलभूत सिद्धांत असा आहे की, कोणत्याही निर्णयाचा परिणाम ज्यांच्यावर होणार आहे, त्यांना त्या निर्णयाच्या आधारभूत माहितीची पूर्ण जाणीव असली पाहिजे आणि त्यांना आपले मत मांडण्याची संधी दिली पाहिजे. परंतु येथे परिस्थिती उलट आहे. माहिती न देता मत मागविणे. त्यामुळे ही प्रक्रिया 'ऐकले जाण्याचा हक्क' (Right to be heard) या तत्त्वालाच बाधा आणणारी ठरते.

या सर्व बाबींच्या पार्श्वभूमीवर, उपवर्गीकरणाच्या प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी काही ठोस उपाययोजना सुचविणे आवश्यक आहे. सर्वप्रथम, न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल पूर्णपणे सार्वजनिक करणे ही अत्यंत मूलभूत गरज आहे. अहवालातील आकडेवारी, विश्लेषण आणि शिफारसी जनतेसमोर मांडल्याशिवाय कोणतीही चर्चा अर्थपूर्ण ठरू शकत नाही. पारदर्शकता ही विश्वासाची पायाभूत अट आहे, आणि ती पूर्ण केल्याशिवाय लोकशाही प्रक्रियेची वैधता निर्माण होऊ शकत नाही. दुसरे म्हणजे, मते आणि आक्षेप नोंदविण्याची प्रक्रिया अधिक सर्वसमावेशक करणे आवश्यक आहे. केवळ ई-मेलपुरती मर्यादित न ठेवता, जिल्हास्तरावर सार्वजनिक सुनावण्या, ग्रामसभांमधून चर्चा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून अभिप्राय गोळा करणे, अशा विविध माध्यमांचा वापर करणे गरजेचे आहे. यामुळे ग्रामीण आणि उपेक्षित घटकांनाही आपले मत मांडण्याची संधी मिळेल. तिसरे म्हणजे, समितीच्या संरचनेत विविधता आणणे आवश्यक आहे. समाजशास्त्रज्ञ, कायदेतज्ज्ञ, अनुसूचित जातींचे प्रतिनिधी, महिला प्रतिनिधी आणि नागरी समाजातील तज्ज्ञ यांचा समावेश केल्यास निर्णय प्रक्रिया अधिक समतोल आणि वास्तवाधारित होऊ शकते. केवळ प्रशासकीय दृष्टिकोनावर आधारित निर्णय घेणे हे अपुरे ठरते. चौथे म्हणजे, उपवर्गीकरणाचा निर्णय घेताना 'डेटा-आधारित धोरण' (शींळवशपलश-लरीशव ӗश्रिळलू) स्वीकारणे अत्यावश्यक आहे. कोणत्या जाती खरोखरच अधिक मागास आहेत, त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती काय आहे, त्यांना मिळालेल्या संधींचे वितरण कसे आहे. या सर्व बाबींचा सखोल अभ्यास करूनच निर्णय घेणे आवश्यक आहे. अन्यथा, उपवर्गीकरण हे केवळ अनुमानांवर आधारित ठरेल, जे दीर्घकालीन दृष्टीने धोकादायक ठरू शकते. पाचवे म्हणजे, या संपूर्ण प्रक्रियेत जनजागृतीला प्राधान्य देणे आवश्यक आहे. अनुसूचित जातीतील नागरिकांना त्यांच्या हक्कांबद्दल, प्रस्तावित बदलांबद्दल आणि त्याच्या परिणामांबद्दल माहिती देणे ही शासनाची जबाबदारी आहे. माहितीशिवाय सहभाग हा केवळ औपचारिक राहतो, आणि औपचारिक सहभागातून न्याय्य निर्णय घडत नाहीत.

शेवटी, अभ्यासक्रमाविना परीक्षा ही उपमा केवळ भाषिक अलंकार नसून, ती या संपूर्ण प्रक्रियेचे वास्तव प्रतिबिंब आहे. जेव्हा नागरिकांना माहिती न देता त्यांच्याकडून मते मागविली जातात, तेव्हा ती लोकशाही प्रक्रिया न राहता केवळ औपचारिकता ठरते. आणि जेव्हा लोकशाही औपचारिकतेपुरती मर्यादित राहते, तेव्हा तिच्या समानता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूळ तत्त्वांना धक्का बसतो. म्हणूनच, आज गरज आहे ती केवळ निर्णय घेण्याची नाही, तर योग्य पद्धतीने निर्णय घेण्याची. पारदर्शकता, समावेशकता आणि न्याय्यतेच्या आधारावरच कोणतेही धोरण समाजासाठी हितकारक ठरू शकते. अन्यथा, सामाजिक न्यायाच्या नावाखालीच सामाजिक विषमता वाढण्याचा धोका निर्माण होतो. आणि हीच बाब या संपूर्ण प्रक्रियेबाबत सर्वात मोठी चिंता निर्माण करणारी ठरते.

– ॲड. सुनिल बगाटे,

◆ पान १ वरून पुढे...

## अंबाजोगाई उपप्रादेशिक....

भिंत, अंतर्गत सिमेंट काँक्रिट रस्ते, वाहनतळ शेड आणि मुख्य प्रवेशद्वारासाठी पुलाचे बांधकाम देखील करण्यात येणार आहे. दिव्यांगांसाठी रॅम्प आणि लिफ्टची सुविधा तसेच पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टिंग व सोलर रूफटॉप यंत्रणा उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे. हा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. मुंदडा यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

## LPG सिलिंडरसाठी....

फसवणुकीपासून वाचवणार नवा नियम – गॅस सिलेंडर बुक करताना फसवणूक होऊ नये म्हणून प्रत्येक ग्राहकाला डीएसी (DAC) क्रमांक मिळेल. डीएसी क्रमांक (डिलिव्हरी ऑथेंटिकेशन कोड) बुकिंगनंतर तुम्हाला पाठवला जाईल. हा क्रमांक तुम्हाला सिलेंडर घेण्यासाठी डिलिव्हरीच्या वेळी दाखवावा लागेल. हा नवीन नियम आधीच लागू करण्यात आलेला असून याद्वारे ९२ टक्के डिलिव्हरी केल्या जात आहेत. पण काही तांत्रिक अडचणींमुळे अलीकडेच नवीन अपडेट्स करण्यात आले आहेत. त्यामुळे ही प्रक्रिया अधिक सुलभ अन् वेगवान झाली आहे. गॅस एजन्सीच्या नंबरवरून, खतठड कॉल किंवा एसएमएसद्वारे सिलिंडर बुक करावे. अथवा वितरकाच्या अधिकृत वेबसाइटवरून एलपीजी सिलेंडर बुक करा. त्यानंतर डीएसी क्रमांक येण्याची प्रतीक्षा करा. तुमचे बुकिंग निश्चित झाल्यानंतर डिलिव्हरी ऑथेंटिकेशन कोड (डीएसी) तयार होईल आणि नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएस, व्हॉट्सप किंवा ईमेलद्वारे पाठवला जाईल.

हा डीएसी (DAC) कोड सुरक्षित ठेवा. हा कोड ओटीपीसारखा आहे. तो कोणाशीही शेअर करू नका. फक्त डिलिव्हरी एजंटलाच द्यावा. जेव्हा डिलिव्हरी बॉय तुमच्याकडे सिलेंडर घेऊन येईल, त्यावेळी त्याला हा डीएसी कोड सांगा. डीएसी कोड सांगितल्यानंतर तुम्हाला सिलेंडर मिळेल. हे लक्षात ठेवा की तुमच्याकडे (DAC) क्रमांक नसल्यास, तुम्हाला सिलेंडरची डिलिव्हरी मिळू शकणार नाही.

गॅस तुटवडा निर्माण झाला त्यावेळी बुकिंगनंतरही अनेकांना डीएसी क्रमांक मिळतच नव्हता. मार्च महिन्यात आलेल्या एका अहवालानुसार, बुकिंग करून पैसे भरूनही अनेक ग्राहकांना ऑथेंटिकेशन कोड मिळत नव्हता. त्यामुळे ग्राहकांना सिलिंडर मिळण्यात मोठ्या अडचणी येत होत्या. ही चूक डिझाइनमधील एका त्रुटीमुळे निर्माण झाली होती. कुठूनही बुकिंग केली तरीही, डीएसी कोड फक्त नोंदणीकृत मोबाइल नंबरवरच पाठवला जात होता. आता हा कोड बुकिंगच्या वेळी व्हॉट्सप नंबर किंवा ईमेलद्वारे दिला जाईल.

## माने कॉम्प्लेक्स.....

नागरिकांची प्रकृती जाणून घेण्यासाठी नगरसेवक माने यांनी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये जाऊन भेट देत विचारपूस केली. या संपूर्ण घटनेत अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनीही वेगाने प्रतिसाद देत आग विझवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. या पथकात सीनियर फायरमन आदमाने, कानतोडे, फायरमन राठोड तसेच वाहन चालक कपाळे आणि ओव्हाळ यांचा समावेश होता. अग्निशामक दलाच्या अथक प्रयत्ना व या भागातील नगरसेवक आदित्य माने यांच्या कार्यतत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला परिसरात सुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून नागरिकांकडून अग्निशामक दलाल कर्मचारी व नगरसेवकाचे कौतुक केले जात आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश...

लिंबागणेश, पोखरी (घाट), पिंपरनई, बेलगाव (सोमनाथवाडी) आदी गावांमध्ये पाणीटंचाईचे सावट गडद होत चालले आहे. शेतातील विहिरी, सार्वजनिक पाणीपुरवठा योजना आणि विंधन विहिरी कोरड्या पडण्याच्या मार्गावर आहेत. तलावातील पाणी साठा संरक्षित ठेवण्याची मागणी– शासनाच्या नियमानुसार तलावातील ६७ टक्के पाणीच सिंचनासाठी वापरण्याची परवानगी असून उर्वरित ३३ टक्के पाणी मानव, जनावरे व वन्यजीवांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. मात्र, या नियमांचे उल्लंघन होत असल्याने भविष्यात गंभीर पाणीबाणी निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. डॉ. ढवळे यांनी तलावातील पाणीसाठा संरक्षित ठेवावा तसेच कामचुकार अधिकार्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाधिकार्यांकडे केली आहे.

जिल्ह्यात पाणीसाठा झपाट्याने घटतोय– वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनाचा वेग वाढला असून जिल्ह्यातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. जिल्ह्यातील १६ मध्यम प्रकल्पांपैकी ३ प्रकल्पांमध्ये २५ टक्क्यांपेक्षा कमी पाणी शिल्लक आहे. तसेच १२६ लघु प्रकल्पांपैकी १२ प्रकल्प जोत्याखाली गेले असून २१ प्रकल्पांमध्ये ५० टक्केच पाणी आहे. शासनाच्या अहवालानुसार, जिल्ह्यातील १४३ धरणांमध्ये सध्या १९८.७१२ दशलक्ष घनमीटर पाणी मृतसाठ्यात आहे, तर ३० धरणांमध्ये १० टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा शिल्लक आहे. दुष्काळाची शक्यता वाढली– बीड जिल्हा दुष्काळग्रस्त म्हणून ओळखला जातो. यावर्षी अल निनो च्या प्रभावामुळे परिस्थिती अधिक गंभीर होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे तातडीने उपाययोजना न केल्यास ग्रामीण भागात तीव्र पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## तिंतरवणी पोलीस...

पोलीस उपनिरीक्षक अजय पान पाटील यांच्या कार्यपद्धतीवरही नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. कारवाई का होत नाही? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

दरम्यान, या गंभीर प्रकरणाची दखल घेत डीवायएसपी खटके साहेबांनी तात्काळ लक्ष घालून वाळू तस्करीवर कडक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे. अन्यथा येणाऱ्या काळात जनआंदोलन उभारण्याचा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.

## शिक्षणाधिकारी डॉ कुंवर....

संच मान्यतेतील त्रुटी, अशैक्षणिक कामांचा वाढता बोजा, प्रलंबित देयके, जुनी पेन्शन योजना, वेतन संरक्षण, वैद्यकीय बिलांची मंजुरी यांसह एकूण १८ मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर करण्यासाठी शिक्षणाधिकारी डॉ कुंवर मॅडम भेट घेतली. मात्र, शिक्षकांच्या अपेक्षांना पूर्णपणे छेद देत शिक्षणाधिकारी डॉ. कुंवर यांनी निवेदन स्वीकारण्याऐवजी शिक्षकांनाच फटकारल्याची घटना घडली. माझ्या बाबतीत बोला, इतर विषय मला सांगू नका !शिक्षकांनी राज्यव्यापी आंदोलन आणि त्यातील मागण्यांविषयी माहिती देण्याचा प्रयत्न केला असता, तुम्ही मला काही सांगू नका, ते माझं काम नाही. तुमचं निवेदन आवक विभागात द्या, माझ्याकडे येऊ नका, अशा कठोर आणि अपमानास्पद शब्दांत शिक्षणाधिकाऱ्यांनी प्रतिक्रिया दिल्याचे सांगितले आहे. तसेचफोटो निवेदन देतानाचा फोटो काढण्यासाठी आला असाल तर अजिबात येऊ नका, असेही त्यांनी सुनावल्याने उपस्थित शिक्षक पदाधिकाऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली.

तीव्र आंदोलनाचा इशारा– या घटनेनंतर शिक्षक सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी जर शिक्षकांच्या मागण्यांकडे तत्काळ लक्ष दिले नाही आणि अशा प्रकारचा अपमानजनक वर्तन सुरूच राहिले, तर भविष्यात अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल असा गंभीर इशारा दिला आहे. या वेळी निवेदन देण्यासाठी जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिवाळ, संजय ढाकणे, सरचिटणीस नरेश गंदगे, सुभाष कंठाळे, शिक्षक सेना जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ, संजय ढाकणे, शिक्षक सेना, जिल्हाध्यक्ष, नरेश गंदगे जिल्हा सरचिटणीस, आप्पासाहेब डोके जिल्हा कार्याध्यक्ष, सुनिल दशरथ जिल्हा कार्यकर्ता, उद्धव घोडके बीड तालुका अध्यक्ष, संदिप केचाळे बीड तालुका सचिव, संतोष पडोळे शिक्षक विचार मंच, संदिप देशपांडे शिक्षक परिषद,आनेराव सर शिक्षक संघ, हाडुळे सर, घोडके सर, उनवणे सर, डोळस सर, आंधळे सर, खेडकर सर, नागरगोजे सर, राठोड सर, घुगे सर, गणेश धाईतिडक, परदेशी सर – इतर संघटना पदाधिकारी, सुनिता पिचड महिला जिल्हाध्यक्ष, सुरेश गुंजाळ, सुभाष कंठाळे, जिल्हा सरचिटणीस, वाव्हळ सर आदी उपस्थित होते. एकूणच, शिक्षकांच्या न्याय्य मागण्यांकडे दुर्लक्ष आणि अधिकाऱ्यांचा कथित उद्धटपणा यामुळे बीड जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रातील असंतोष अधिकच तीव्र झाला असून, येणाऱ्या काळात हे आंदोलन अधिक चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत.

◆ पान ४ वरून पुढे...

## बीड परशुराम जन्मोत्सव....

राहुल पांडव, विजेंद्र चौधरी, दत्ता परळकर, अशोक घोडके, संतोष राऊत, सुनील मिसाळ आदी उपस्थित होते. संध्याकाळी धोंडीपुरा भागातून शोभा यात्रेस सुरुवात करण्यात येऊन टिळक रोड, माळीवेस, सुभाष रोड, सहयोगनगर मार्गे सर्वेश्वर गणपती मंदिर सभागृह येथे समारोप करण्यात आला.कार्यक्रमसाठी बंटी सेलमोकर,राधेश्याम गुरखुदे,शुभम जोशी,योगेश गुळवेलकर,संदेश देवळे,राम काळे,गिरीश सेलमोकर,गौरव कुलकर्णी,विशाल जोशी, महेश देशमुख, विशाल कुलकर्णी, जगदीश आनेराव राहुल जोशी,शुभम जोशी,रेणूकादास व्यास,आदींनी परिश्रम घेतले कार्यक्रमास बीड शहरातील भावीकभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## श्रावस्ती सौंदरमलचा...

या विद्यार्थिनीचा संस्कार केंद्राच्या संचालिका तथा शिक्षिका सुनिता आंधळे तसेच गिलबिले मॅडम व गव्हाणे मॅडम उजगरे मॅडम कसबे मॅडम यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले होते. कठोर परिश्रम आणि शिक्षिकांच्या मार्गदर्शनातून मिळवलेले हे यश कौतुकास्पद आहे. असे उद्गार या संस्कार केंद्राचे संचालक श्री. विष्णू आंधळे सर यांनी व्यक्त केले. या यशाबद्दल संस्कार केंद्राच्या संचालक, संचालिका व पालकांनी गुणवंत विद्यार्थिनी श्रावस्ती विलास सौंदरमलचे खूप कौतुक केले व शुभेच्छा दिल्या आणि मार्गदर्शक शिक्षिकांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या यशाबद्दल श्रावस्तीचे वडवणी तालुक्यातुन अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## अखिल भारतीय बंजारा...

भविष्यकाळात तुम्हाला राजकारणात मोठी संधी मिळो आणि तुमच्या माध्यमातून समाजाची प्रगती व्हावी, हीच आग्रही इच्छा ! आपल्या उज्वल भविष्यासाठी आणि पुढील वाटचालीस अनंत शुभेच्छा !

## पोखरी (घाट) गावातील...

तिच्याभोवती कोणतीही संरक्षण व्यवस्था नसल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. या विहिरीमुळे लहान मुले, दुचाकीस्वार, बैलगाड्या तसेच जनावरांच्या जीविताला धोका असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या पार्श्वभूमीवर ध्रुपदी खिल्लारे, गोरख खिल्लारे, मधुकर खिल्लारे, मच्छिंद्र खिल्लारे, बबन खिल्लारे, जालिंदर खिल्लारे, हौसराव खिल्लारे, साहेबराव धुमाळ, दत्तु खिल्लारे यांसह खिल्लारे, मुळीक व झांजुर्णे वस्तीवरील ग्रामस्थांनी संबंधित विहिरीला तातडीने संरक्षक कठडा किंवा भिंत उभारण्याची मागणी केली आहे. ग्रामस्थांनी दुर्घटना घडण्यापूर्वीच प्रशासनाने उपाययोजना कराव्यात, अशी ठाम भूमिका घेतली असून, याकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

## रस्त्याचे उद्घाटन...

उद्घाटनानंतर प्रशासनाचे दुर्लक्ष– गाजावाजात उद्घाटन झाले खरे, पण त्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. केवळ फोटो काढण्यापुरते उद्घाटन होते का? असा संतप्त सवाल रहिवाशांनी उपस्थित केला आहे. खडी आणि अर्धवट खोदकामामुळे कॉलनीतील लहान मुले आणि ज्येष्ठांना घरातून बाहेर पडणे कठीण झाले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# ‘मिशन लक्ष्यवेध’ अंतर्गत कुस्ती व लॉन टेनिस विभागीय निवड चाचणी दि.23 रोजी

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत विभागीय क्रीडा निपुणता केंद्र छत्रपती संभाजीनगर येथे स्थापन होत आहे. त्यातील लॉन टेनिस व कुस्ती या खेळाच्या विभागस्तरीय खेळाडू निवड चाचणीचे आयोजन गुरुवार दि. २३ रोजी विभागीय क्रीडा संकुल येथे होत आहे. इच्छुक व पात्र खेळाडूंनी उपस्थित रहावे,असे आवाहन क्रीडा उपसंचालक शेखर पाटील यांनी केले आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे मार्फत ‘मिशन लक्ष्यवेध योजना’ ही धोरणात्मक योजना राबविण्यात येत आहे. या अंतर्गत लॉन टेनिस, कुस्ती, बॅडमिंटन आणि बॉक्सिंग या क्रीडा प्रकाराकरिता विभागीय क्रीडा निपुणता केंद्र विभागीय क्रीडा संकुल, छत्रपती संभाजीनगर येथे स्थापन करण्यात येत आहे. या केंद्रांमध्ये निवड झालेल्या खेळाडूंना निवासी स्वरूपात दर्जेदार व तंत्रशुद्ध क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, निवास व भोजन सुविधा तसेच क्रीडा विज्ञान विषयक सहाय्य, देश विदेशातील क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग व खेळाडूंसाठी वैद्यकीय विमा सुरक्षा सुविधा शासन मान्यतेनुसार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विभागीय क्रीडा निपुणता केंद्र, विभागीय क्रीडा संकुल, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने लॉन टेनिस आणि कुस्ती या क्रीडा प्रकाराच्या विभागस्तरीय खेळाडू निवड चाचणीचे आयोजन गुरुवार दि. २३ रोजी चाचणी आयोजीत करण्यात आल्या आहेत.

निवडचाचणी करिता निकष खालीलप्रमाणे: लॉन टेनिस : वयोमर्यादा– २५ वर्षाआतील मुले/मुली (त्या वर्षाच्या ३१ डिसेंबर रोजी), आवश्यक कागदपत्रे– जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, गत २ वर्षातील क्रीडा विषयक कामगिरीचे प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज फोटोग्राफ तीन, शाळा / महाविद्यालय बोनाफाईड प्रमाणपत्र, पालकाचे संमती पत्र इ., अधिवास– महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असला पाहिजे, क्रीडा कामगिरी विवरण–Top 3 Rank Players in AITA, National Ranking Player, राज्यस्तरावरील पदक प्राप्त खेळाडू किंवा राष्ट्रीयस्तरावरील सहभागी खेळाडू (SGFI, AITA, Khelo India National Only) गत २ वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती (Fitness) चाचण्यांमध्ये पात्र होणे आवश्यक, शासन मान्यताप्राप्त डॉक्टराकडून दिलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य.

कुस्तीः वयोमर्यादा– २५ वर्षाआतील मुले/मुली (त्या वर्षाच्या ३१ डिसेंबर रोजी), आवश्यक कागदपत्रे– जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, गत २ वर्षातील क्रीडा विषयक कामगिरीचे प्रमाणपत्र, पासपोर्ट साईज फोटोग्राफ ०३, शाळा / महाविद्यालय बोनाफाईड प्रमाणपत्र, पालकाचे संमती पत्र इ., अधिवास– महाराष्ट्र राज्यातील खेळाडू असला पाहिजे, क्रीडा कामगिरी विवरण–राज्यस्तरावरील पदक प्राप्त खेळाडू किंवा राष्ट्रीयस्तरावरील सहभागी खेळाडू (SGFI, WFI, Khelo India National Only) गत २ वर्षाच्या क्रीडा कामगिरीचे मुल्यमापन करण्यात येऊन क्रीडा कौशल्य व तंदुरुस्ती (Fitness) चाचण्यांमध्ये पात्र होणे, शासन मान्यताप्राप्त डॉक्टराकडून दिलेले वैध वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य.

निवड चाचणीचे ठिकाण :विभागीय क्रीडा संकुल, सुतगिरणी चौक, छत्रपती संभाजीनगर–४३१००९

निवड चाचणीची वेळ: सकाळी १०.०० वाजता पासून ,उपस्थिती : सकाळी ९.३० वाजता

संपर्क क्रमांक: श्री. तेजस कुलकर्णी (क्रीडा अधिकारी) ८०८७६६१५८९

इच्छुक व पात्र खेळाडूंनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित रहावे,असे आवाहन क्रीडा उपसंचालक शेखर पाटील यांनी केले आहे.

### आकांक्षित जिल्हा कार्यक्रमात परभणीचा समावेश

## शासन निर्णय जारी, विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात

**परभणी । प्रतिनिधी**

राज्याच्या प्रादेशिक संतुलित विकासासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत, शासनाने परभणी जिल्ह्याचा आकांक्षित जिल्हा कार्यक्रमात समावेश केला आहे. या निर्णयामुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळणार आहे. याबाबतचा शासन निर्णय राज्याच्या नियोजन विभागाने आज जारी केला आहे.



केंद्राच्या नीति आयोग मार्फत सुरू झालेल्या आकांक्षित जिल्हा कार्यक्रमाने देशातील मागास जिल्ह्यांच्या विकासात प्रभावी भूमिका बजावली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनानेही या संकल्पनेचा विस्तार करत परभणीसह सहा नवीन जिल्ह्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे. पालकमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर या शासन निर्णयावर प्रतिक्रिया देताना म्हणाल्या की, परभणी जिल्ह्याचा आकांक्षित जिल्हा कार्यक्रमात झालेला समावेश हा विकासाला गती देणारा महत्त्वपूर्ण निर्णय आहे. या निर्णयामुळे जिल्ह्याच्या प्रगतीला नवी दिशा आणि गती मिळणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून जिल्हयात आरोग्य, शिक्षण, शेती व जलसंपदा, कौशल्य विकास, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास या क्षेत्रांत ठोस बदल घडवले जातील. प्रत्येक नागरिकांपर्यंत विकासाचा लाभ पोहोचवणे, युवकांना रोजगाराची संधी देणे आणि ग्रामीण भागाला बळकटी देणे हे शासनाचे उद्दिष्ट आहे. हा निर्णय परभणीच्या उज्ज्वल भविष्यासाठी निश्चितच मोलाचा ठरेल. प्रमुख क्षेत्रांवर भर – या कार्यक्रमातंर्गत परभणी जिल्ह्यात आरोग्य व पोषण, शिक्षण, कृषि व संलग्न सेवा, मूलभूत पायाभूत सुविधा आणि सामाजिक विकास या महत्त्वाच्या क्षेत्रांवर विशेष लक्ष दिले जाणार आहे. तालुका स्तरावरही विकासाला गती – आकांक्षित तालुका कार्यक्रमाच्या विस्तारातही परभणी जिल्ह्यातील पाथरी, जिंतूर, परभणी, सेलू, सोनपेठ, मानवत, गंगाखेड, पालम, पूर्णा या तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाला विशेष गती मिळणार आहे. या अंतर्गत आरोग्य, शिक्षण, शेती व संलग्न सेवा, पायाभूत सुविधा आणि सामाजिक विकास या क्षेत्रांत ठोस सुधारणा केल्या जातील. निधी व योजनांना प्राधान्य – या समावेशामुळे परभणी जिल्ह्यास राज्य योजना, जिल्हा वार्षिक योजना आणि केंद्र पुरस्कृत योजनांमधून प्राधान्याने निधी मिळणार आहे. या निर्णयामुळे परभणी जिल्ह्यात पायाभूत सुविधा उभारणी, कृषी विकास, आरोग्य सेवा सुधारणा, शिक्षणाचा दर्जा उंचावणे आणि रोजगारनिर्मिती यांसारख्या क्षेत्रांत ठोस बदल घडून येणार आहेत. एकूणच, आकांक्षित जिल्हा कार्यक्रमात समावेश झाल्याने परभणी जिल्ह्यासाठी विकासाचे नवे दार खुले झाले असून, येत्या काळात जिल्हा प्रगतीच्या नव्या उंचीवर झेप घेईल.

## पशुपालकांसाठी सुवर्णसंधी ‘पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड’ योजनेतून 3 लाखांपर्यंत अर्थसहाय्य

**परभणी । प्रतिनिधी**

राज्यातील पशुपालन, शेळी–मेंढीपालन, कुक्कुटपालन आणि वराहपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्यासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे ‘पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड’ (KCC) मोहीम राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पशुपालकांना त्यांच्या पशुधनाच्या देखभालीसाठी व दैनंदिन खर्चासाठी (खेळते भांडवल) आकर्षक व्याज सवलतीसह कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे. ज्या शेतकऱ्यांकडे किसान क्रेडिट कार्ड नाही, त्यांना १.६० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज विनातारण दिले जाणार आहे. दूध संस्थेची हमी असल्यास ही मर्यादा ३ लाख रुपयांपर्यंत वाढवता येते. तसेच, ज्यांच्याकडे आधीपासून घउउ आहे, त्यांनाही ३ लाखांपर्यंतची पतमर्यादा वाढवून घेण्याची सुविधा आहे. या कर्जाचा




मूळ व्याजदर ९ टक्के असला तरी, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र शासनाकडून ३ टक्के आणि राज्य शासनाच्या ११ फेब्रुवारी २०२६ च्या निर्णयानुसार ४ टक्के अशी एकूण ७ टक्क्यांपर्यंत व्याज सवलत मिळते. याशिवाय बँकांकडूनही २ टक्के सवलत देण्यात येत असल्याने, नियमित परतफेड करणाऱ्या पशुपालकांना प्रत्यक्षात शून्य टक्के व्याजदराचाही लाभ मिळू शकतो. सन २०२६–२७ पासून ‘मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना’ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना या क्रेडिट कार्डद्वारे खेळते भांडवल उपलब्ध करून दिले जाणार आहे. राज्यातील सुमारे १० लाख पशुपालकांना या योजनेच्या कक्षेत आणण्याचे उद्दिष्ट पशुसंवर्धन विभागाने ठेवले आहे. अधिक माहितीसाठी नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क साधावा किंवा १९६२ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क करावा. दूध सोसायटी, दूध संघ किंवा दूध उत्पादक कंपनीचे सभासद असलेले आणि अद्याप या योजनेचा लाभ न घेतलेले पशुपालक या योजनेस पात्र आहेत. जिल्ह्याचे पशुसंवर्धन उपआयुक्त हे या योजनेचे सनियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. पात्रता अटी लाभार्थ्याने केंद्र/राज्य/जिल्हा परिषदेच्या कोणत्याही अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा. सर्व पशुधनाची ‘भारत पशुधन’ (NDLM²) पोर्टलवर नोंदणी आवश्यक. ठरावीक मर्यादितील पशुधन असलेल्यांनाच व्याज सवलत लागू. कर्जाची परतफेड एक वर्षाच्या आत करणे बंधनकारक. शासनाने वेळोवेळी घालून दिलेल्या अटींचे पालन आवश्यक. पशुधन व्यवसायाला चालना देण्यासाठी व ग्रामीण भागातील पशुपालकांना आर्थिक मदत मिळावी,

### आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये २२ एप्रिल रोजी विशेष आस्थिरोग शिबिर ; अत्यल्प दरात शस्त्रक्रियेची संधी

**बीड । प्रतिनिधी**

सर्वसामान्य रुग्णांना दर्जे दार व परवडणाऱ्या आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आनंदऋषीजी हॉस्पिटल, जालना रोड, शाहू बँकेजवळ, बीड येथे बुधवार, दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत विशेष आस्थिरोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांच्या प्रेरणेने व संत आदर्श ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली जैन सोशल फेडरेशन, अहमदनगर यांच्या वतीने हे शिबिर राबविण्यात येत आहे. वाढत्या अस्थिरोगांच्या समस्यांवर योग्य वेळी निदान व उपचार मिळावा, यासाठी हे शिबिर उपयुक्त ठरणार आहे. या शिबिरात गुडघेदुखी, कंबरदुखी, पाठदुखी, सांधेदुखी तसेच मनके व सांधे बदलाशी संबंधित विविध आजारांवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. विशेष म्हणजे, संपूर्ण गुडघा व खुबा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया फक्त ६५,००० मध्ये गुणवत्तापूर्ण इम्प्लांटसह उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



*बीड: वडवणी तालुक्यातील देवळा (बु.) येथे रिपाइं नामफलकाचे उद्‌ घाटन करताना युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्यासह महादेव उजगरे, किसन तांगडे, शाम वीर, दीपक जावळे, सुशील जावळे, भास्कर जावळे व इतर रिपाइं पदाधिकारी.*

**जाहीर प्रगटन**

बीड जिल्हा व परिसरातील तमाम जनतेस या प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, मी, नामे **सुनिल बबनराव गायकवाड, रा. राजुरी (नवगण), ता.जि.बीड** यांचा सन् २००४– २००५ चा गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, राजुरी (न.), ता. जि. बीड येथून काढलेला शाळा सोडल्याचा मुळ दाखला, मी राजुरी (न.) ते बीड असा प्रवास करत असताना प्रवासा मध्ये सदर टी.सी. सह असलेल्या कागदपत्रांची बॅग गहाळ झाली. त्यामध्ये माझा मुळ टि.सी.व इतर महत्वाचे कागदपत्रे होती, त्याचा आम्ही खूप शोध घेतला परंतू मिळून आलेले नाहीत. मला शैक्षणिक / शासकीय कामासाठी सदर मुळ टि.सी.ची अत्यंत आवश्यकता आहे. तरी, सदरील टी. सी. असलेली मुळ बॅग कोणास आढळून आल्यास किंवा टी.सी. आढळून आल्यास कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा किंवा मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच या दाखल्याचा कोणीही गैरवापर करू नये. सदर मुळ टी. सी. आणून देणाऱ्यास योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

करिता हे जाहिर प्रगटन.

**बीड**

**दिनांक : १६/०४/२०२६**

**शिक्का**

**जाहिर प्रगटन देणार**
**सुनिल बबनराव गायकवाड**
**रा. राजुरी (न.), ता.जि. बीड**
**मो. क्र. ९५१८५२१८११**

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. मा.ये. वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ६२१ / २०२६**

**सितासाम उबाळे व इतर वि. निरंक**

ज्यापेक्षा रावसाहेब गंगाराम उबाळे, हे दिनांक १९/०७/२०१२ रोजी च–हाटा, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहे, आणि तसेच अर्जदार

**१. सितासाम पि. गंगाराम उबाळे, वय ८४ वर्षे, धंदा. शेती, रा. च–हाटा, ता. जि. बीड. २. पाटीलबा पि. गंगाराम उबाळे (मयत) २.१– सत्यभाम भ्र. पाटीलबा उबाळे, वय.८१ वर्षे, धंदा. घरकाम, रा. च–हाटा, ता. जि. बीड २.२ बापुसाहेब पि. पाटीलबा उबाळे (मयत), २.२.१ रतन पि. बापुसाहेब उबाळे, वय २५ वर्षे, धंदा. शेती, रा. च–हाटा, ता. जि. बीड २.२.२ महावीर पि. बापुसाहेब उबाळे, वय २५ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे, २. २.३ उषाबाई पि. बापूसाहेब उबाळे, वय ४६ वर्षे, धंदा. घरकाम, रा. वरीलप्रमाणे ३. आत्माराम पि. गंगाराम उबाळे, (मयत), ३.१ मथुराबाई भ्र. आत्माराम उबाळे, वय ७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. वरीलप्रमाणे ३.२ वासुदेव पि. आत्माराम उबाळे, वय ४८ वर्षे धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे, ४. उत्तम पि. गंगाराम उबाळे (मयत), पुष्पाबाई पि. उत्तम उबाळे, वय ६२ वर्षे, धंदा. घरकाम, रा. च–हाटा, ता. जि. बीड ४.१ ह.मु. तुळजाई निवास, शिवराम नगर, वसमत रोड, सशक्ती बील्डींग मागे, जुने आर.टी.ओ ऑफीसजवळ, परभणी, ता. जि. परभणी, ४.२ सचिन पि. उत्तम उबाळे, वय ४६ वर्षे, धंदा. शेती, रा. च–हाटा, ता. जि. बीड, ह.मु. अक्षर एलेंटा, मुंबई पुणे हायवे, तातवडे, पुणे.**

अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत रावसाहेब गंगाराम उबाळे यांचे सख्खे भाऊ आहेत. अर्जदार क्र. २.१ ही मयत रावसाहेब उबाळे यांची भावजाई म्हणजेच अर्जदार क्र. २ ची पत्नी असुन, अर्जदार क्र. २.२ बापुसाहेब उबाळे हा पाटीलबा उबाळे यांचा मुलगा आहे. अर्जदार क्र.२.१ ते २.३ हे मयत रावसाहेब उबाळे यांच्या भावाचे नातु आहेत, म्हणजेच अर्जदार क्र. २.२ चे अपत्ये आहेत. अर्जदार क्र. ३ ही मयत रावसाहेब उबाळे यांची भावजाई म्हणजेच मयत भाऊ अर्जदार क्र. ३ यांची पत्नी असुन, अर्जदार क्र. ३.२ हा मयत रावसाहेब उबाळे यांचा पुतण्या म्हणजेच अर्जदार क्र. ३ यांचा मुलगा आहे. अर्जदार क्र. ४.१ ही रावसाहेब उबाळे यांची भावजाई म्हणजेच मयत भाऊ अर्जदार क्र. ४ यांची पत्नी असुन अर्जदार क्र. ४.२ हा रावसाहेब उबाळे यांचा पुतण्या म्हणजेच अर्जदार क्र. ४ चा मुलगा आहे.

ज्या अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार पाली ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत नामे रावसाहेब गंगाराम उबाळे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २० एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**प्रकरणाची पुढील तारीख १२/०६/२०२६ ही आहे.**
**(ॲड. उबाळे एस.एस. यांचे मार्फत)**

**आदेशावरून**
**(स्वाक्षरीत)**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**मा. ॲड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर**

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, “मधुमीन”, डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज ॲक्ट 2002 व अब्रिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** — दि. 20/04/2026

अर्जदार : नाथ मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. मालेगाव ता. गेवराई जि. बीड

**विरूद्ध — गैरअर्जदार**

1) क्र. 11/2026 1) म्हस्के गिता संतोष 2) थोरात बाळासाहेब विष्णु 3) खरात काकासाहेब सर्जेराव रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर
2) अर्ज. क्र. 12/2026 1) म्हस्के संतोष नानासोब रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर 2) खोसे योगेश शिवाजी 3) खोसे शिवाजी पंढरीनाथ दोघे रा. रा. मालेगाव (खु) ता. गेवराई जि. बीड
3) क्र. 13/2026 1) कर्डिले विश्वास सटवाजी 2) कर्डिले पार्वती विश्वास 3) कर्डिले डिंगाबर नाथा रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर
4) अर्ज. क्र. 14/2026 1) वाघ बद्री बाबुराव 2) वाघ द्वारकाबाई बद्री 3) शिंदे बप्पासाहेब विठ्ठल सर्व रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर
5) क्र. 15/2026 1)कुऱ्हे कुंडलिक अंबादास 2)कुऱ्हे कडुबाई कुंडलिक 3)कुऱ्हे सुलोचना अंबादास रा.कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर
6) क्र. 16/2026 1) पन्हाळकर विनायक रामदास 2) म्हस्के रामेश्वर सर्जेराव 3) पन्हाळकर मिराबाई विनायक सर्व रा. कांबी ता. शेवगाव
7) क्र. 17/2026 1) राजपुत विजयसिंग शिवसिंग 2) राजपुत सुनिता विजयसिंग 3) राजपुत व्यंकटेश भिमसिंग रा. कांबी ता. शेवगाव
8) क्र. 18/2026 1) पन्हाळकर मिराबाई विनायक 2) भेरे परमेश्वर रावसाहेब 3) पन्हाळकर विनायक रामदास सर्व रा. कांबी ता. शेवगाव
9) क्र. 19/2026 1) शिंदे पांडुरंग जनार्दन 2) शिंदे रूख्मिनी पांडुरंग 3) गोरे संजयकुमार दत्तात्रय, रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर
10) क्र. 20/2026 1) गोरे संजयकुमार दत्तात्रय 2) गोरे मनिषा संजय 3) शिंदे पांडुरंग जनार्दन सर्व रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर
11) क्र. 21/2026 1) हंबर अण्णा नबाजी 2) हंबर ज्ञानेश्वर अण्णासाहेब 3) हंबर बद्रिनाथ अण्णासाहेब सर्व रा. कांबी ता. शेवगाव
12) क्र. 22/2026 1) पारनेरे कांताबाई काकासाहेब 2) पारनेरे नितीष बप्पासाहेब 3) म्हस्के सोमनाथ भानुदास सर्व रा. कांबी ता. शेवगाव
13) क्र. 23/2026 1) पारनेरे सुनिता बप्पासाहेब 2) पारनेरे बप्पासाहेब काकासाहेब 3) म्हस्के नंदु राजाराम सर्व रा. कांबी ता. शेवगाव
14) क्र. 24/2026 1) खरात काकासाहेब सर्जेराव 2) खरात सुनिता काकासाहेब 3) म्हस्के रामेश्वर सर्जेराव सर्व रा. कांबी ता. शेवगाव
15) क्र. 25/2026 1) म्हस्के गोविंद भास्कर 2) हंबर ज्ञानेश्वर अण्णासाहेब 3) कुऱ्हे महेश प्रभाकर रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर
16) क्र. 26/2026 1) बिडकर महेश सुनिल 2) म्हस्के संजय भानुदास 3) बिडकर सुनिल शिवमुर्ती रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर
17) अर्ज. क्र. 27/2026 1) मडके जालींदर श्रीमंत 2) मडके रेखा जालिंदर 3) मडके वैभव नारायण रा. कांबी ता. शेवगाव जि. अहिल्यानगर
18) अर्ज. क्र. 28/2026 1) शेख फिरोज फारूक 2) कापसे कैलास शामराव 3) शेख आर्शद इब्राहीम सर्व रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड
19) अर्ज. क्र. 29/2026 1) शेख खय्युम मुनीर 2) शेख रियाज बशिर 3) पठाण हनिफ महेमुद सर्व रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड
20) अर्ज. क्र. 30/2026 1) रमेश बबन टिळेकर 2) मिराबाई बबन टिळेकर 3) आबादेव अर्जुन कापसे सर्व रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड
21) अर्ज. क्र. 31/2026 1) शेख अस्लम सलीम 2) अशोक विठ्ठलराव दळवी 3) शेख सलीम महेबुब सर्व रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड
22) अर्ज. क्र. 32/2026 1) शेख रियाज बशीर 2) संतोष अशोक नवपुते 3) शेख खय्युम मुनीर सर्व रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड
23) अर्ज. क्र. 33/2026 1) कुरेशी मतीन अलिमिया 2) किशोर अर्जुन दिलवाले 3) तिर्थराज दिगंबर शिंदे रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड
24) अर्ज. क्र. 34/2026 1) शेख आर्शद शेख इब्राहिम 2) शेख इब्राहिम प्यारेमिया 3) शेख नय्युम खलिम रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड
25) अर्ज. क्र. 35/2026 1) इनामदार मुश्ताकोद्दीन इसाकोद्दीन उर्फ मुशाफोद्दीन इसाकोद्दीन 2) मोहम्मद मुजाहेद इसाकोद्दीन 3) सय्यद अर्शद शौकत सर्व रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड

(प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीसद्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपणापैकी काहींनी घेऊन गैरहजर राहिलात. काहींनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 15/05/2026 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांसह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / आदेश करण्यात येईल, याची नोद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्यांची दिले आहे.

ॲड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • मंगळवार दि. २१ एप्रिल २०२६ •

## थोडक्यात...

### श्रीसंत भगवानबाबा व संत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे दि २१ एप्रील रोजी

## पांडुरंग महाराज यांचे काल्याचे किर्तन



**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी नगररोड बीड येथे संत वामनभाऊ, संत भगवानबाबा यांच्या कृपा आशिर्वादाने प्रतिवर्षी प्रमाणे याहीवर्षी वर्ष १४वे संत वामनभाऊ, संतभगवानबाबा, संत तुकाराम, विठ्ठल-रूक्मिणि, हनुमान देवता मुर्ती प्राणप्रतिष्ठेच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त सर्व धर्म समभाव राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक दि १९/४/२०२६ते२१/४/२०२६ या कालावधी मध्ये त्रिदिवशीय हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे या सप्ताहाचे द्वितीय दिनी. दि२१ एप्रील मंगळवार रोजी सकाळी ११वा ह भ प पांडुरंग महाराज (श्रीक्षेत्र डोंगरेश्वर संस्थान करंजवन) यांचे अमृत तुल्य काल्याचे किर्तन होईल तरी बीड शहरातील परीसरातील भाविक भक्तांनी किर्तन श्रावणाचा व महाप्रसाद लाभ घ्यावा असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक व श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी चे अध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप व प्रतिष्ठानचे सर्व सहकारी व इंद्रप्रस्थ कॉलनी परिसरातील भाविक भक्त यांनी केले.

# माजलगावात वाळूचा काळाबाजार ?

## गरीबांना बंदी, रात्री टिपरांची धाव- प्रशासन गप्प का ?

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यात वाळू वितरणावर निर्बंध असल्याने गोरगरिबांचे घरकुल बांधकाम ठप्प असताना, रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर वाळू वाहतूक सुरू असल्याचे गंभीर आरोप समोर येत आहेत. एकीकडे सर्वसामान्यांना वाळू मिळत नसल्याची तक्रार आहे, तर दुसरीकडे रात्री टिपरद्वारे वाळूची अविरत वाहतूक होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. स्थानिकांच्या मते, नियम फक्त गरीबांसाठीच का? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. अनेक कुटुंबांचे बांधकाम अर्धवट राहिले असून, आर्थिक अडचणी वाढत आहेत. तरीही रात्रीची वाळू वाहतूक थांबत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



काही प्रभावशाली घटकांच्या संगनमताने हा प्रकार सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. मात्र याबाबत अधिकृत पुष्टी नसून, सखोल चौकशीची मागणी जोर धरत आहे. शहरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी केल्यास वास्तव स्पष्ट होऊ शकते, असा दावा स्थानिकांकडून केला जात आहे. महसूल व पोलीस प्रशासन रात्रीच्या कारवायांवर नियंत्रण ठेवण्यात अपयशी ठरत असल्याचा आरोप होत असून, संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

### ● एलसीपी गप्प का ?

**माजलगावात रात्रीच्या वेळी सुरू असलेल्या कथित वाळू वाहतुकीकडे स्थानिक गुन्हे शाखा (डउझ) व पोलीस प्रशासन दुर्लक्ष करत आहेत का, असा सवाल उपस्थित होत आहे. वारंवार तक्रारी होऊनही ठोस कारवाई दिसत नसल्याने संशय वाढला आहे. सीसीटीव्ही फुटेज तपासून दोषींवर कारवाई का होत नाही ? एलसीपीची भूमिका नेमकी काय, याचे उत्तर नागरिकांना अपेक्षित आहे.**

# बीड परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने भव्य शोभायात्रा

## आकर्षक रथ, अश्वारूढ परशुराम, भक्तिमय बँड पथकाने बीडकर भारावले

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात प्रतिवर्षी प्रमाणे यंदाही भगवान परशुराम यांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित काढण्यात आलेले भव्य शोभायात्रेत लोक प्रतिनिधीसह भगवान परशुराम भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. बीड शहरात गेल्या एक दशका पासून अक्षय तृतीया अर्थात भगवान परशुराम यांच्या जन्मोत्सव निमित्त भव्य शोभायात्रा चे आयोजन करण्यात येते. यंदाही रविवार १९ एप्रिल रोजी भव्य अशी शोभायात्रा काढण्यात आली. आकर्षक रथ त्यावर असणारी रोषणाई, सोबत छत्रधारी च्या सानिध्यात भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यासाठी लोकांनी गर्दी केली.



भगवान परशुराम यांची वेशभूषा धारण केलेले अश्वारूढ अशोक कुलकर्णी हे खास आकर्षण ठरले तर अत्यंत सुंदर असे भक्तिमय बँड पथकाने बीड करांची पसंती मिळवली. वे शा स विनायक महाराज पटांगणकर,माजी आ.अमरसिंह पंडित, आ.संदीप क्षीरसागर, भाजपचे नेते योगेश क्षीरसागर, द्वारकाधीश मित्र मंडळ अध्यक्ष परशुराम गुरखुदे, नगर सेवक सागर देशपांडे, लक्ष्मीकात बाहेगव्हाणकर, प्रमोद कुलकर्णी, प्रमोद पुसरेकर, दिपक कुलकर्णी, अजिंक्य पांडव, नगर सेवक अमर नाईकवाडे, महेश वाघमारे, दिलीप खिस्ती, उदय जोशी,नगर सेवक गोविंद शिराळे, महेश धांडे, गजानन जोशी,बाळासाहेब ठिगळे, चंद्रकांत जोशी परशुराम जन्मोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष ॲड. अक्षय कुलकर्णी (भालेराव), संदीप पालसिंगनकर(अध्यक्ष) आकाश जवकर (उपाध्यक्ष) रोहित कुलकर्णी (सचिव) शुभम कायदे (सहसचिव) प्रमोद वझे,गणेश तालखेडकर, ▶▶ उर्वरित पान २ वर

## श्रावस्ती सौंदरमलचा वडवणी तालुक्यात डंका १५९ पैकी १२८ गुण घेऊन तालुक्यात प्रथम

**वडवणी । प्रतिनिधी**

मंथन राज्यस्तरीय शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झालेला असून यामध्ये वडवणी येथील ज्ञान संस्कार बालशिक्षण केंद्राची श्रावस्ती विलास सौंदरमल वर्ग १ ला या विद्यार्थिनीने १५९ पैकी १२८ मार्क घेऊन तालुक्यात पहिला येण्याचा मान मिळवला. ही परीक्षा प्रामुख्याने इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली जाणारी एक राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा आहे. मंथन वेलफेअर फाउंडेशनफयांच्या वतीने विद्यार्थ्यांमधील बौद्धिक क्षमता आणि सामान्य ज्ञान वाढवण्यासाठी ही परीक्षा घेतली जाते. मराठी, इंग्रजी आणि सेमी-इंग्रजी अशा तिन्ही माध्यमांतील विद्यार्थी ही परीक्षा देऊ शकतात. यामध्ये प्रामुख्याने भाषा (मराठी /इंग्रजी), गणित, बुद्धिमत्ता चाचणी आणि सामान्य ज्ञान या विषयांवर आधारित प्रश्न असतात. परीक्षेत उत्तम गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय आणि केंद्रस्तरीय गुणवत्ता यादीनुसार ट्रॉफी, प्रमाणपत्र आणि रोख रकमेची बक्षिसे दिली जातात. ज्ञान संस्कार बाल शिक्षण केंद्र वडवणी येथील या संस्कार केंद्रातील इयत्ता १ ली ची विद्यार्थिनी कु. श्रावस्ती विलास सौंदरमल या विद्यार्थिनीने १५९ पैकी १२८ गुण घेऊन वडवणी तालुक्याचे नाव रोशन केलं आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर



## अखिल भारतीय बंजारा सेवा संघाचे अध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांचा वाढदिवस विवीध उपक्रम व्दारे साजरा



**तलवाडा । प्रतिनिधी**

राजकारण आणि समाजकारण यांचा समतोल राखत, स्वखर्चाने समाजाची सेवा करणारे एक निस्वार्थी बंजारा समाजाचातील कोहिनूर प्रमाणे चकाकनारे नेतृत्व अण्णासाहेब राठोड हे गेवराईच्या राजकीय आणि सामाजिक पटलावर आपल्या कार्यकर्तृत्वाने स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करणारे धडाडीचे पदाधिकारी असुन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गटा) चे सन्माननीय तालुकाध्यक्ष तथा अखिल भारतीय बंजारा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष यांचा वाढदिवस दिनांक २०/४/२००२६ रोजी तलवाडासह गेवराई तालुक्यात विविध उपक्रमा व्दारे साजरा करण्यात आला. तालुका भरातुन त्यांच्यावर प्रतेक्ष भेटुन व विवीध माध्यमातून शुभेच्छेचा वर्षाव करण्यात आला. त्यांच्या एका हितचिंतकांने आपल्या लेखणीतून शब्दरुपी दिलेल्या वाढदिवासाच्या शुभेच्छा या ठिकाणी जस्याच तश्या वर्णित केल्या आहेत. आदरणीय अण्णा साहेब राठोड, तुमच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू आहेत. तुम्ही केवळ एक राजकीय पद भूषवणारे नेते नसून, गोरगरिबांच्या डोळ्यांतील पाणी पुसणारे एक संवेदनशील माणूस आहात. गेवराई तालुक्यातील तांडा, वाडी आणि वस्त्यांवरील जो दिनदलित, वंचित आणि बहुजन समाज आहे, त्यांच्यासाठी तुम्ही नेहमीच एक आशेचा किरण ठरला आहात. गेवराई कोल्हेररोड नाईक नगर येथील तुमच्या कार्यालयात भरणारा जनता दरबार हा केवळ नावापुरता नसून, तो खऱ्या अर्थाने सामान्यांना न्याय देणारे मंदिर झाले आहे. मंग तुमच्या कडे येणारा तो कष्टकरी ऊसतोड कामगार असो, भविष्याची स्वप्ने पाहणारा विद्यार्थी असो किंवा अन्यायाने गांजलेला सामान्य माणूस असो; तुम्ही कधीही जात-पात किंवा पक्ष न पाहता, केवळ माणुसकीच्या नात्याने प्रत्येकाला आर्थिक, सामाजिक आणि राजकीय पाठबळ देत आला आहात तुमच्या याच दिलदार आणि प्रेमळ स्वभावामुळे आज गेवराईच्या कानाकोपऱ्यात तुमचं नाव आदराने घेतलं जाते. आज तुमच्या वाढदिवसानिमित्त आराध्य दैवत राष्ट्रीय संत श्री बालब्रह्मचारी सेवालाल महाराज यांच्या चरणी मी मनापासून हीच प्रार्थना करतो की, तुम्हाला उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो. तुम्ही आजवर समाजासाठी जे निस्वार्थ योगदान दिले आहे, त्याचे फळ म्हणून येणाऱ्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## पोखरी (घाट) गावातील रस्त्यालगत धोकादायक विहिरींना संरक्षक कठडे बसविण्याची ग्रामस्थांची मागणी

### प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात - डॉ. गणेश ढवळे





**लिंबागणेश । प्रतिनिधी**

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी येथे रस्त्यालगतच्या विहिरीत कार कोसळून ९ जणांचा मृत्यू झाल्याच्या दुर्घटनेनंतर राज्यभरात अशा धोकादायक विहिरींचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर बीड तालुक्यातील विविध गावांमध्येही रस्त्यालगत असलेल्या विहिरींबाबत ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार बीड यांना निवेदन देऊन रस्त्यालगत धोकादायक स्थितीत असलेल्या विहिरींची तातडीने पाहणी करून आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. संबंधित विहिरींच्या मालकांना सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संरक्षक भिंत किंवा कठडा उभारण्याचे निर्देश देण्यात यावेत, अशीही त्यांनी मागणी केली. दरम्यान, बीड तालुक्यातील पोखरी (घाट) येथील खिल्लारे वस्ती परिसरात रस्त्याच्या कडेला असलेली विहीर अत्यंत धोकादायक अवस्थेत असून ▶▶ उर्वरित पान २ वर

## माकेगावात शेतीच्या वादातून जीवघेणा हल्ला; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल



**बीड । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील माकेगाव येथे शेतीच्या बांधावरून असलेल्या जुन्या वादाचे रूपांतर भीषण हाणामारीत झाले असून, एका व्यक्तीवर दगडाने जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे. ही घटना टेलरच्या दुकानासमोर घडली असून याप्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या हल्ल्यात कल्याण हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्या मेंदूवर लातूर येथील रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. फिर्यादी संजय देशमुख यांच्या तक्रारीनुसार, आरोपी यांनी संगनमत करून हे कृत्य केले. गेल्या दोन वर्षांपासून सुरू असलेल्या घरगुती वादातून आरोपींनी कल्याण यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने पकडून त्यांच्या डोक्यात दगडाने प्रहार केला. मध्यस्थी करणाऱ्या फिर्यादीलाही यावेळी धक्काबुक्की करण्यात आली. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९ आणि ११५(२) सह अन्य कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पोलीस उपनिरीक्षक जगताप पुढील तपास करत आहेत.

## रस्त्याचे उद्घाटन जोरात, काम मात्र कोमात; मंगलनाथ कॉलनीतील सिमेंट रस्ता, नालीचे काम रखडले



**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील प्रभाग क्रमांक ५ मधील मंगलनाथ कॉलनीच्या नशिबी सध्या खड्डे आणि पाण्याची नासाडीच आली आहे. साधारण दहा-बारा दिवसांपूर्वी मोठ्या थाटामाटात येथील सिमेंट रस्ता आणि नाली बांधकामाचे उद्घाटन करण्यात आले. मात्र, उद्घाटनाचा नारळ फुटला आणि कामाची चाके तिथेच रुतली. नारळ फोडणारे नेते आणि काम करणारे कंत्राटदार दोघेही गायब झाल्याने येथील रहिवाशांना मात्र आता चिखल, खडी आणि खोदलेल्या रस्त्यावरून जीव मुठीत धरून चालण्याची वेळ आली आहे. नगर परिषद प्रशासनाच्या ढिम्म कारभारामुळे मंगलनाथ कॉलनीतील मूलभूत सुविधांचा पुरता बोजवारा उडाला आहे. रस्ता आणि नालीसाठी रस्ता ठिकठिकाणी खोदून ठेवला आहे. रस्त्यावर खडी पसरून ठेवल्यामुळे दुचाकीस्वार घसरून पडत आहेत, तर पायी चालणेही जिकिरीचे झाले आहे. विशेष म्हणजे, या बेजबाबदार खोदकामामुळे कॉलनीतील मुख्य जलवाहिनीला (पाइपलाइन) गंभीर इजा झाली असून, अनेक ठिकाणी नळ फुटले आहेत. त्यातून हजारो लिटर पिण्याचे शुद्ध पाणी नाल्यांमधून वाहून जात आहे. एकीकडे उन्हाळा वाढत असताना दुसरीकडे पाण्याच्या नासाडीमुळे नागरिकांना पाणीटंचाईच्या झळा सोसाव्या लागत आहेत.

रहिवाशांची गुणवत्तेसाठीही मागणी - केवळ रस्ता पूर्ण करून भागणार नाही, तर हे काम दर्जेदार आणि टिकाऊ व्हावे, यासाठीही नागरिकांनी आग्रही भूमिका घेतली आहे. तातडीने नाली, रस्ता आणि फुटलेली पाइपलाइन दुरुस्त करून प्रशासनाने कॉलनीचा श्वास मोकळा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. ▶▶ उर्वरित पान २ वर